CNR No. MHRG040027692025

दाखल तारीख : ३१/०७/२०२५
नोंदणी तारीख : ०७/०८/२०२५
निकाल तारीख : ०९/०४/२०२६
कालावधी : ०० व. ०८ म. १२ दि.

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल, जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११८४/२०२५**
**निशाणी क्र.१४/ब**

१. **विद्या विनय प्रधान**
वय- ६२ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. ए-३०३, साई प्लाझा को.हौ. सोसायटी,
टेलिफोन एक्सचेंज जवळ, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

२. **मानसी आशुतोष राज**
**पुर्वाश्रमीची मानसी विनय प्रधान**
वय- ३९ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. ए-३०३, साई प्लाझा को.हौ. सोसायटी,
टेलिफोन एक्सचेंज जवळ, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ **... अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही **... सामनेवाले**

..............................................................................

अर्जदारांतर्फे विधिज्ञ – विरेंद्र टी. कुलकर्णी.

..............................................................................

**- न्यायनिर्णय -**
**(घोषित दिनांक ०९/०४/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ चे वडील विनय मनोहर प्रधान हे रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथे दिनांक १९/०८/२०२२ रोजी मयत झाले. मयत विनय मनोहर प्रधान यांची आई कै. मालिनी मनोहर प्रधान या दिनांक ०७/१०/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. मयत विनय मनोहर प्रधान यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत विनय मनोहर प्रधान यांच्या मालकीची सदनिका क्र.३०३, तिसरा मजला, ए विंग, प्लॉट क्र.२३८, साई प्लाझा अपार्टमेंट, ता. पनवेल, जि. रायगड ही मिळकत आहे.

३. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.८ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर यादी निशाणी क्र.४ अन्वये मयत विनय मनोहर प्रधान यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, खरेदीखताची प्रत, अर्जदार क्र.१ व २ यांच्या आधारकार्डच्या प्रती, रेशनकार्डची प्रत, निशाणी क्र.१३ वरील यादीसोबत मालिनी मनोहर प्रधान यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.११ अन्वये पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत 'दैनिक रायगड नगरी' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक १९/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.६ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत विनय मनोहर प्रधान यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत विनय मनोहर प्रधान यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्जदार क्र.१ विद्या विनय प्रधान व अर्जदार क्र.२ मानसी आशुतोष राज पुर्वाश्रमीची मानसी विनय प्रधान हे मयत विनय मनोहर प्रधान यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ विद्या विनय प्रधान व अर्जदार क्र.२ मानसी आशुतोष राज पुर्वाश्रमीची मानसी विनय प्रधान यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमीत करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.04.09 17:22:32 +0530

पनवेल
दिनांक : ०९/०४/२०२६

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.